| MHRT100007772022 | प्रकरण दाखल तारीख ०९/१२/२०२२ |
|---|---|
| | प्रकरण नोंदल्याची तारीख ०९/१२/२०२२ |
| | निकाल दिनांक ०८/०९/२०२३ |
| | कालावधी ०० वर्षे / ०८ महीने /३० दिवस |

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (I) )**

**राजापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी - सुशिल का. सोनवणे)**

| संक्षीप्त फौजदारी खटला क्र.३६२/२०२२ - निशाणी क्र.९ लगत | |
|---|---|
| **खटला क्रमांक** | संक्षीप्त खटला क्र.३६२/२०२२ |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलिस ठाणे अथवा राज्य उत्पादन शुल्क** | गु.र.क्र.१९१/२०२२, राजापूर पोलिस ठाणे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासनतर्फे राजापूर पोलिस ठाणे |
| **प्रतिनिधीत्व** | विशेष सरकारी अभियोक्ता श्री.ओ.ए.गांगण |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | मंगेश गोपाळ पडवळ<br>वय – ४७ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. मु. पो. वाळवड, पाटीलवाडी<br>ता.राजापूर, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | विद्वान विधीज्ञ श्रीम.आर.एस.बिर्जे |

भाग ब

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(II)**)

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०२/११/२०२२ |

| | |
|---|---|
| फिर्याद पोलिस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०२/११/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | ०९/१२/२०२२ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ३०/०१/२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १०/०२/२०२३ |
| निकालाची तारीख | ०८/०९/२०२३ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधीत नाही |

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामीनावर सोडलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली** | **दिलेली शिक्षा** | **फौ. प्र.सं .कलम ४२८ संपरिक्षेचे दरम्याने निरुध्द केलेल्या कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंगेश गोपाळ पडवळ | ------- | २०/०१/२०२३ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) | आरोपीस निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | -------- |

भाग क

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(III)**)

**साक्षीदारांची यादी**

## अ. सरकारी साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | नाव | (पुराव्याचे स्वरुप ) साक्षीदाराची भुमीका |
|---|---|---|
| सा. क्र.१ | रामकृष्ण ज्ञानदेव कात्रे | फिर्यादी |
| सा.क्र.२ | राजेंद्र बाबाजी गुरव | पंच |

## ब. बचावाचे साक्षीदार – निरंक

क. अभियोगपक्षाच्या / बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी

अभियोगपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी

| वर्णन | निशाण |
|---|---|
| फिर्याद | ११ |
| साक्षीदाराची अ.क्र.२ वरील सही | १२ |

बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी – निरंक

## मुद्देमाल

| मुद्देमाल वस्तू क्र. | वर्णन |
|---|---|
| १. | १० लिटर मापाच्या एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये ०९ लिटर गावठी हातभट्टीची दारु |

**टिप–** मुद्देमाल न्यायालयात जमा नाही.

## न्यायनिर्णय

## (घोषणा दिनांक ०८/०९/२०२३)

## अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे

१. दिनांक ०२/११/२०२२ रोजी १८.५० वाजणेचे दरम्याने मौजे वाळवड, पाटीलवाडी येथे १० लिटर मापाच्या एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये ०९ लिटर गावठी

हातभट्टीची दारु असा एकूण रक्कम रुपये ५००/- किंमतीची गावठी हातभट्टीची दारु विनापरवाना बेकायदेशीरपणे आरोपीने त्याच्या कब्जात बाळगली व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केलेला आहे असे अभियोगपक्षाचे कथन आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा दोषारोप आरोपीला त्याचे भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता, आरोपीने गुन्हा नि.क्र.९ वर नाकबुल केला व खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने फिर्यादी रामकृष्ण ज्ञानदेव कात्रे व राजेंद्र बाबजी गुरव या दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

२. आरोपीविरुध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदयानुसार खटला चालविण्यात आला. आरोपीला गुन्हयाचे विवरण वाचून दाखविले असता आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले. त्यावरुन प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

३. अभियोगपक्षातर्फे दोन साक्षीदारांची साक्ष तपासून पाहिली असता, आरोपीविरुध्द पुराव्यामध्ये कोणताही गुंतवणारा पुरावा न आल्याने आरोपीचे कलम ३१३ (१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार जबाब नोंदविण्याची आवश्यकता भासली नाही.

४. उपरोक्त विवेचनावरुन म्हणजेच अभियोगपपक्षाने सादर केलेल्या विवेचनावरुन माझ्या समोर खाली नमुद मुद्दे उपस्थित होतात व त्या मुद्दयांचे निष्कर्ष कारणांसहीत मी पुढीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १ | दिनांक ०२/११/२०२२ रोजी १८.५० वाजणेचे दरम्याने मौजे तळवडे, गोसावीवाडी येथे १० लिटर मापाच्या एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये ०९ लिटर गावठी हातभट्टीची दारु असा एकूण रक्कम रुपये ५००/- किंमतीची गावठी हातभट्टीची दारु विनापरवाना बेकायदेशीरपणे आरोपीने त्याच्या कब्जात बाळगली व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केलेला आहे असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | ...... नकारार्थी |
| २ | काय आदेश? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने सरकारी साक्षीदार फिर्यादी रामकृष्ण ज्ञानदेव कात्रे व राजेंद्र बाबजी गुरव यांना नि.क्र.९ लगत तपासले. अभियोगपक्ष फिर्याद, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा या दस्तऐवजावर विसंबून आहेत. अभियोगपक्षातर्फे विद्वान विशेष सरकारी वकिल श्री.ओ.ए.गांगण तर बचाव पक्षातर्फे विद्वान वकील श्रीम.आर.एस.बिर्जे यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमीमांसा

### मुद्दा क्रमांक १ करीता

६. प्रस्तुतच्या खटल्यातील सरकारी साक्षीदार क्र.१ फिर्यादी श्री.रामकृष्ण

ज्ञानदेव कात्रे यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात फिर्यादी प्रमाणे कथन केले आहे. ती फिर्याद नि.क्र.११ वर आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, घटनास्थळाला लागून लोकवस्ती आहे. घटनास्थळ कोणच्या मालकीचे आहे हे त्यांना सांगता येणार नाही. प्रत्यंतरणकरीता नमुना एका स्वच्छ बाटलीत काढून घेतला होता. साक्षीदार क्र.२ पंच श्री.राजेंद्र बाबजी गुरव यांनी अभियोगपक्षाला सहकार्य होईल असा कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्याने कथन केलेला नाही. एकंदरीत साक्षीपुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासात त्यांना घटनास्थळाला लागून लोकवस्ती आहे. घटनास्थळ कोणच्या मालकीचे आहे हे त्यांना सांगता येणार नाही. प्रत्यंतरणकरीता नमुना एका स्वच्छ बाटलीत काढून घेतला होता. त्यामूळे फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द योग्य फिर्याद नोंद केली याबाबत संशय निर्माण होतो. साक्षीदार क्र.२ पंच श्री. राजेंद्र बाबजी गुरव यांनी अभियोगपक्षाला सहकार्य होईल असा कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्याने कथन केलेला नाही. तसेच सदर केसमधील तपासी अधिकारी व दुसरे पंच साक्षीदार यांच्या साक्षी नोंदविण्यात आलेल्या नाहीत. त्यामूळे सदर घटनेला दुजोरा देणारा एकही स्वतंत्र साक्षीदार नाही. त्यामूळे सदर खटल्यात दाखल केलेल रासायनिक परीक्षणाचे प्रमाणपत्र यावरुन आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातील रसायन हे गावठी हातभट्टीची दारु होती असे विनासंशय शाबीत होत नाही. त्याचप्रमाणे घटनास्थळ हे तेच आहे असे दर्शविण्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तरी

आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभट्टीची दारु जप्त केल्याबाबत कोणताही विश्वसनिय पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे आरोपीने आपल्याजवळ गावठी हातभट्टीची दारु बाळगली, हे सिध्द होत नाही. उपरोक्त कारणामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकरार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी पुढील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी मंगेश गोपाळ पडवळ यांना कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा मधून कलम २५८ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार निर्दोष सोडण्यात येत आहे.

२ आरोपीचे जामीन विसर्जीत करण्यात येत आहे.

३ आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार १५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन बंधपत्र पुर्वीचे पुढे चालू ठेवण्यात येते.

४ सदर खटल्यातील दारुचा जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर कायदयाप्रमाणे नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, रत्नागिरी यांचेकडे पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

दिनांक ०८–०९–२०२३ श्री.सुशील का. सोनवणे
राजापूर न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग,
राजापूर

"Judgment/Order in :- Sum. Cri. Case No.362/2022
I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.
Name of Stenographer:-Shri. A.B.Patil.
Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.
Date of Decision :- 08-09-2023
Judgment signed by P.O. on :-08-09-2023
Judgment uploaded on :- 12-09-2023"